**अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या जलसंपदा विभागातील अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गातील अधिकाऱ्याची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतचे आदेश रद्द करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन,**
**जलसंपदा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : एसयुटी २०२१/प्र.क्र.८७/२०२१/आ (वर्ग १),**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी २०२४.

**वाचा :-**
(१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१/१६-ब, दिनांक १५.०६.२०२०.
(३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०२०/प्र.क्र.१८७-अे/१६-ब, दिनांक ३०.०६.२०२०.
(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.१८७ अे/१६-ब, दिनांक २८.०९.२०२०.
(५) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २७.११.२०२०.
(६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २८.१०.२०२१.
(७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी २०१९/प्र.क्र.५८१ए/१६-ब, दिनांक १४.१२.२०२२.
(८) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१९/(प्र.क्र.५१३/२०१९)/भाग-१/आ (वर्ग १), दिनांक १४.१०.२०२०, दिनांक २६.११.२०२१, दिनांक १९.०९.२०२२ व दिनांक २२.०९.२०२३.

**<u>शासन निर्णय</u>**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथील दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि, जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अथवा सादर करु न शकलेल्या अथवा अन्य जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करणे, तसेच उक्त अनुसूचित जमातीच्या पदावर नियुक्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त होणारी पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविणे याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार, अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि, जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अथवा सादर करु न शकलेल्या, अन्य मागासवर्ग जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या अधीक्षक अभियंता (स्थापत्य) संवर्गातील श्री.रविकुमार गजानन पराते, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) यांच्या सेवा संदर्भ क्रमांक ८ येथील दिनांक १४.१०.२०२० च्या शासन निर्णयान्वये आदेशाच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या असून, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांनुसार त्यांच्या अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या सेवेस संदर्भ क्रमांक ८ येथील दिनांक २६.११.२०२१, दिनांक १९.०९.२०२२ व दिनांक २२.०९.२०२३ च्या शासन निर्णयांन्वये मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. श्री.पराते, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) यांनी रिट याचिका क्र.२७५७/२००२ मध्ये मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या अवमान याचिका क्र.५३/२०२१ मध्ये त्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या दिनांक १४.१०.२०२० च्या आदेशास आव्हान दिले असून, मा.न्यायालयाने दिनांक २८.११.२०२२ च्या आदेशामधील परिच्छेद-६ मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

"We do not propose to issue the notice to the respondents, but would afford time to re-look their action of placing the petitioners on the supernumerary posts in view of the decision in Writ Petition No.903/2020."

३. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.९०३/२०२० व अन्य रिट याचिकांमध्ये दिनांक ०४.०५.२०२१ रोजी मा.न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला आहे :-

"Once the judgement of this Court inter parties has become final and there is no element of fraud at the time of delivering the judgement by this Court, the said judgement would bind the parties and operate as a *res judicata*. The subsequent judgement of the Apex Court laying down the proposition of law different that the one on the basis of which the judgements are delivered by this Court and have attained finality cannot be reopened. Quietess will have to be given to the litigation. The protection granted by this Court to the employment of the petitioners in the writ petitions filed by them earlier bind the parties and shall continue.

In the light of the above, the Government Resolution dated 21st December, 2019 shall be read in a manner not to include the employees whose tribe claims are invalidated, but are granted protection in employment under the judgements/orders of this Court and the said judgements/orders have attained finality.

In view of the aforesaid, the impugned communications placing the petitioners on supernumerary posts are quashed and set aside.

Rule accordingly is made absolute in above terms. No costs."

४. मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांच्या दिनांक ०४.०५.२०२१ च्या आदेशाविरोधात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.००२५३०/२०२२ दाखल केली असून, सदर विशेष अनुज्ञा याचिका सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे. यास्तव, सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र.००२५३०/२०२२ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून श्री.रविकुमार गजानन पराते, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले संदर्भाधिन क्रमांक ८ येथील दिनांक १४.१०.२०२० चे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत आहेत.

५. हा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२७०/२०२३/आरक्षण-२ (ए), दिनांक १९.१०.२०२३ च्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०११०१२२४१५५४२७ असा आहे. तसेच, सदर शासन निर्णय जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर (https://wrd.maharashtra.gov.in) देखील उपलब्ध आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**( राखी स. चव्हाण )**
**अवर सचिव, महाराष्ट्र, शासन.**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अप्पर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव (लाक्षेवि)/ सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) महासंचालक/ सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
८) जलसंपदा विभागातील सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग.
९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१०) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
११) श्री.र.ग.पराते, अधीक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, भंडारा (२ प्रती)
१३) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) संग्रहार्थ/कार्यासन आ(वर्ग १)